# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १७ ] मंगळवार, जुलै २०, २०१०/आषाढ २९, शके १९३२ [ पृष्ठे २, किंमत रुपये २६.००

**असाधारण क्रमांक २७**

**प्राधिकृत प्रकाशन**


**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.**— महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | पृष्ठे १-२ |


दिनांक १९ जुलै २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २० जुलै २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक ३० जून २०१० रोजी, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१० प्रख्यापित केला होता ;

१९९९ चा महा. १९. २०१० चा महा. अध्या. ६

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकसष्ठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३० जून २०१० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम १४ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याचे कलम १४ च्या पोट-कलम (७) मध्ये, " सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरिता " या मजकुराऐवजी " बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरिता " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९९९ चा महा. १०

सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१०, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २०१० चा महा. अध्या. ६

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला कोणताही आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली कृती किंवा कार्यवाही, किंवा यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक २६] मंगळवार, जुलै २०, २०१०/आषाढ २९, शके १९३२ [पृष्ठे २, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक ५४

प्राधिकृत प्रकाशन


महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra University of Health Sciences (Amendment Act, 2010 (Mah. Act No. XVII of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. XVII OF 2010.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette" on the 20th July 2010.)*

An Act further to amend the Maharashtra University of Health Sciences Act, 1998.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra University of Health Sciences Act, 1998, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra University of Health Sciences (Amendment) Ordinance, 2010, on the 30th June 2010;

Mah. X of 1999.

Mah. Ord. VI of 2010.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra University of Health Sciences (Amendment) Act, 2010.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 30th June 2010.

Amendment of section 14 of Mah. X of 1999.

2. In section 14 of the Maharashtra University of Health Sciences Act, 1998 (hereinafter referred to as "the principal Act"), in sub-section (*7*), for the words "a term not exceeding six months" the words "a term not exceeding twelve months" shall be substituted. Mah. X of 1999.

Repeal of Mah. Ord. VI of 2010 and saving.

3. (*1*) The Maharashtra University of Health Sciences (Amendment) Ordinance, 2010, is hereby repealed. Mah. Ord. VI of 2010.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done or taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.